दिनांक १२ डिसेंबर २०१६ रोजी मलकापूर जि. बुलडाणा येथे झालेल्या दंगलीतील आपद्ग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत. (रुपये १,९७,०००/-)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ २०१७/प्र.क्र.२८८/म-०३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीखः ३ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ-११-०३/प्र.क्र.३१०/म-३, दि. २४ ऑगस्ट २००४
२) शासन निर्णय क्रमांकः आरएलएफ-२०१४/६३/प्र.क्र.३२९/म-३, दिनांक ५ जानेवारी २०१६
३) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे पत्र क्रमांकः गृह विभाग कक्ष/४.२/कावि/५५९/२०१७, दिनांक ११/०९/२०१७
४) जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचे सुधारित पत्र क्रमांकः गृह विभाग कक्ष/ ४.२/ कावि/ ३२५/ २०१९, दिनांक २२/०३/२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

दिनांक १२ डिसेंबर २०१६ रोजी ता.मलकापूर, जि.बुलडाणा येथे झालेल्या दंगलीमध्ये काही व्यक्तींच्या मालमत्तेचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

शासनाच्या स्थायी धोरणानुसार संदर्भाधीन क्र.१ शासन निर्णयानुसार दंगलग्रस्त मृत, अपंग व जखमी व्यक्तींना द्यावयाचे मदतीचे दर निश्चित करण्यात आले आहे. तसेच संदर्भाधीन क्र.२ शासन निर्णयानुसार दहशतवाद, दंगल, बॉम्बस्फोट व नक्षलवादी कारवाया इत्यादी मानवनिर्मित आपत्तीमुळे झालेल्या मालमत्ता नुकसानीबाबत आपद्ग्रस्तांना द्यावयाच्या मदतीचे सुधारीत निकष व दर निश्चित करण्यात आले आहे. यानुसार जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी संदर्भाधीन क्र.४ येथील पत्रान्वये दिनांक १२ डिसेंबर २०१६ रोजी मौजे मलकापूर, ता.मलकापूर, जि.बुलडाणा येथे झालेल्या दंगलीतील आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी रु.१,९७,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. त्यानुसार सदर आपदग्रस्तांना संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदींनुसार मदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

वरील प्रस्तावनेत नमुद केल्यानुसार जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिनांक १२ डिसेंबर २०१६ रोजी मलकापूर, जि.बुलडाणा येथे झालेल्या दंगलीतील आपदग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी रु. १,९७,०००/- (रुपये एक लक्ष सत्त्यानव हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यात येत आहे. तसेच बीम्स प्रणालीवर सदर निधी विभागीय आयुक्त, अमरावती यांना वितरीत करण्यात येत आहे.

२. याबाबतचा खर्च “मागणी क्र.सी-५, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-६०-इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम-२००-इतर कार्यक्रम, (०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य (०१)(०१) दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्या व्यक्तींना सहाय्य , ३१, सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (२२३५ ०३४७) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरचे अनुदान हे शासनाच्या दि. २४ ऑगस्ट २००४ व दि. ५ जानेवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयामधील विहित निकष व दर तसेच नमुद अटींच्या अधीन राहून खर्च करण्यात येत आहे, याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रण अधिकारी यांनी घ्यावी.

४. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कोषागार/उप कोषागार यांच्याकडे पाठविण्यात येणाऱ्या देयकासोबत जोडल्या जाणाऱ्या संगणक स्लीपमध्ये गौण/उप शिर्षाचा संगणक-संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा. तसेच खर्चाचा मेळ महालेखापाल यांनी नोंदविलेल्या खर्चाशी घेण्यात यावा व महालेखापालांच्या ताळमेळ प्रमाणपत्रासह विनियोजन लेखे शासनाकडे तात्काळ पाठवावेत.

५. सदर प्रकरणी खर्चाचे पत्रक विहित कालमर्यादेत न चुकता महसूल व वन विभागाला प्राप्त होईल, याची जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी दक्षता घ्यावी. तसेच प्रचलित नियमानुसार मदतीचे वाटप करण्यात यावे. दि. २४ ऑगस्ट २००४ व दि. ५ जानेवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या अटी तसेच पंचनाम्यानुसार दंगल बाधितांना मदत देण्यासाठी मंजूर रक्कमेचा विनियोग करण्यात यावा. नियंत्रक अधिकाऱ्यांनी याबाबतचा हिशेब ठेवून निधीच्या विनियोगाबाबतची माहिती व उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेळीच सादर करावी.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०३१२३११५१०१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.03 12:38:59 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) विभागीय आयुक्त, अमरावती.
२) जिल्हाधिकारी, बुलडाणा.
३) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा बुलडाणा

४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
५) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१व २, मुंबई/नागपूर
६) संचालक, लेखा व कोषागारे, संगणक शाखा, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
७) वित्त विभाग (व्यय-०९/व्यय-१०/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई-३२.
८) कार्यासन अधिकारी, (कार्यासन ब-१, म-११/पीएसी व पीएसी-१), महसूल वन वन विभाग, मंत्रालय ,मुंबई.
९) निवड नस्ती (कार्यासन म-०३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.